मराठवाड्याच्या विकासात रेशीम उद्योगांचे योगदान - एक चिकित्सक अभ्यास

संशोधन आराखडा

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड

शाखा वाणिज्य व व्यवस्थापन

संशोधक

सपना अंबादास पुपुलवाड

प्रतिभा निकेतन महाविद्यालय

मार्गदर्शक

डॉ. लक्षटे बी. बी.

वाणिज्य विभाग

आदर्श महाविद्यालय,हिंगोली

डिसेंबर २०२३

मराठवाड्याच्या विकासात रेशीम उद्योगाचे
योगदान- एक चिकित्सक अभ्यास

प्रस्तावना-

भारत हा कृषी प्रधान देश आहे. भारतात मोठ्या प्रमाणात शेती व्यवसाय केला जातो दुग्धव्यवसाय आणि कुकुट पालन व्यवसाय या सारखाच रेशीम शेती व्यवसाय हा शेतीस पुरक व्यवसाय आहे. हा व्यवसाय अत्यंत कमी खर्चात व शेतकऱ्यांकडे उपलब्ध असलेल्या साहित्यातुन करता येतो. या व्यवसायात तुती वनस्पतीची लागवड व किक संगोपन पध्दतीचा वापर केला जातो. हा व्यवसाय कमी मजुरात मोठया प्रमाणात करता येतो तसेच अत्यंत कमी भांडवलात या व्यवसाची सुरवात करता येते या व्यवसायातुन कमीत –कमी वेळेत जास्तित जास्त उत्पन्न मिळविता येतो. तसेच या व्यवसायातुन निर्मीत होणाऱ्या पक्क्या मालाच्या खरेदीची हमी सुध्दा दिली आहे. सुशिक्षीत बेरोजगारांना नोकरी शिवाय या रेशीम व्यवसायात दरमहा उत्पन्न मिळविता येते. इतर शेती पीका प्रमाणे यात पुर्ण व मोठ्या प्रमाणात नुकसान होत नाही रेशीम शेती व व्यवसायात वेळ, श्रम व पैसा वाचेल व एकुण उत्पनात मोठया प्रमाणात वाढ होते.

रेशीम उद्योगात तुतीची लागवत करण्या करीता 0.5 एकर ते 1 एकर एवढ्या मर्यादीत जागेत करता येते. तसेच एप्रिल-मे महिन्यात पाणी मिळाले नाही तरी तुतीची रोपे मरत नाहीत. तसेच तुती शेतीत इतर पिक घेऊन उत्पन्नात भर घालता येते. रेशीम शेती विपरीत परिस्थितीतही शेतकऱ्यांना उदरनिर्वाह साठी लागणारे उत्पन्न मिळवुन देणारा उद्योग आहे. यासाठी कोणतीही औषधे फवारणी करावी लागत नाही. यामुळे जमिनीचा पोतही कायम राहतो. किमान आठ महिने पाणी आणि पाण्याचा निचरा होणाऱ्या जमिनीतही शेती करता येते. इतर कोणत्याही पीकाला रेशीम उद्योग पर्याय आहे. रेशीम चे पाच ते सहा प्रकार आहेत. जे वेगवेगळ्या प्रजातीच्या किड्या पासुन मिळतात आणि ते किटक वेगवेगळ्या वनस्पतीवर पाळले जातात या मध्ये खालील प्रकारचे काही रेशीम आहेत.

1. तुती रेशीम
2. तुती नसलेले रेशीम
3. कोरल रेशीम
4. ऐरी किंवा एरंडेल रेशीम
5. टसर रेशीम

रेशीम उद्योगासाठी बिजांची उपलब्धता मोठया प्रमाणावर असल्यास वर्षातुन तिन वेळा उत्पन्न घेता येते. या उद्योगात कमी भांडवल व अधिक नफा असुन शेतकऱ्यांचे जिवनमान उंचावणारा हा उद्योग आहे. डॉ.कांद्री म्हणतात कोणत्याही उद्योगातील उत्पादनात मागणी हा घटक महत्वाचा असतो मागणी नसेल तर उत्पादनाला किंमत नसते सध्या परिस्थीतीत रेशीम उद्योगाला मोठ्या प्रमाणात मागणी आहे. रेशीम पासुन साडी, कापड, औषधे, सौंदर्य प्रसादने, ऐरी रेशीम बॅग, पर्स, गृहसजावटीसाठी विविध साधने निर्मीती केली जातात.

या संशोधनातून मराठवाड्यातील उदयोजकांना रेशीम उद्योग विषयक माहिती व्हावी या हेतूने '**मराठवाड्याच्या विकासात रेशीम उद्योगांचे योगदान – एक चिकित्सक अभ्यास** 'या विषयाची निवड केली कारण मराठवाड्यात बीड, उस्मानाबाद, जालना, औरंगाबाद या जिल्हांमध्ये तुतीची लागवड मोठया प्रमाणात केली जाते या जिह्यात रेशीम पासुन मिळणारे उत्पन्न जास्त आहे.

रेशीम व्यवसायातुन अनेक उपउत्पादने मिळतात शिवाय हा एक अनुकुल उद्योग आहे. आणि ग्रामिण उद्योगात महत्वाची भुमीका बजावतात.

<u>संशोधनाची उद्दिष्टे-</u>

कोणतीही संशोधन लिहीत असताना किंवा त्याची मांडणी करत असताना संशोधक ते संशोधन का करत आहे यामागील सविस्तर कारण म्हणजे संशोधनाची उद्दिष्टे होय.

प्रत्येक संशोधकाला संशोधन करण्यापूर्वी संशोधनाची उद्दिष्टे निश्चित करावी लागतात या संशोधनाची उद्दिष्टे खालील प्रमाणे आहेत.

1. रेशीम उद्योग उद्योजकांना स्वावलंबी बनविते.व वाढत्या स्पर्धेत टिकून राहण्यास प्रवृत्त करणे.
2. रेशीम उद्योग करण्याकरिता उपलब्ध असलेली सरकारी अनुदानेबाबत माहिती पुरविणे.
3. रेशीम उद्योगातून धागा निर्माण करणे व इतर उत्पादनाबाबत माहिती देणे.
4. रेशीम व्यवसायातून सुशिक्षित बेरोजगारांना स्वयंरोजगाराच्या संधी देणे.
5. रेशीम व्यवसाय हा एक शेतीस पूरक उद्योग आहे.आणि त्यामुळे ग्रामीण विकासाचे उद्दिष्ट साध्य करता येते.

<u>संशोधनाची गृहीतके-</u>

1. रेशीम उद्योग अत्यल्प उत्पन्न असलेल्या उद्योगाची उत्पन्न पातळी वाढवितो.
2. रेशीम उद्योग कमीत-कमी भांडवलात उभारण्यात येतो.
3. रेशीम उद्योग करण्यासाठी उच्चशिक्षित असण्याची आवश्यकता नसते.
4. रेशीम व्यवसाय कोरडवाहू जमिनीवर सहजपणे करता येते व त्यातून चांगले उत्पन्न मिळविता येते.
5. रेशीम उद्योगामुळे मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्माण होऊ शकतो.

<u>संशोधनाची महत्त्व-</u>

<u>1.</u>या उद्योगातून मराठवाड्यातील बेरोजगारी दूर करून लोकांना रोजगार मिळतील
2 ग्रामीण भागातील अर्थव्यवस्था सुधारण्यास मदत होते.
3. कमी खर्चात हा उद्योग ग्रामीण भागात सुरू करता येतो
4.मागासलेल्या भागांचा आर्थिक विकास साधण्यासाठी रेशीम उद्योग हा उत्तम पर्याय ठरू शकतो
5. हे कमी गर्भधारणा कालावधी आणि उच्च परताव्यासह जलद उत्पादन देते.
6. रेशीम किडा औषधी उत्पादने देतात, ज्याचा उपयोग औषधांमध्ये केला जाऊ शकतो.
7. सर्व रेशीम व्यवसाय गावाधारीत आहेत आणि त्यामुळे रोजगाराच्या शोधात ग्रामीण भागातून शहरी भागात लोकांचे स्थलांतर रोखले जाते.
8. रेशीम शेती मातीचे संरक्षण,खत,इंधन स्त्रोत, प्रदूषण नियंत्रण, एकात्मिक शेती,आणि जमिनीचा वापर यामध्ये योगदान देते.
9. रेशीम शेती त्याच्या वजनाच्या 10-30 टक्के आद्रता शोषून घेण्यास सक्षम असतो ज्यामुळे रेशीम एक माफक प्रमाणात श्वास घेण्यायोग्य फॅब्रिक बनवते.

<u>अभ्यासाची व्याप्ती:</u>

<u>अभ्यासाची व्याप्ती खालील प्रमाणे आहेत.</u>

1. भौगोलिक-

मराठवाड्यातील रेशीम शेतीला उद्योगाच्या या संशोधनात समावेश करण्यात आला आहे.हे संशोधन मराठवाड्यातील आठ जिल्ह्यांपुरता मर्यादित आहे.

2. कार्यात्मक व्याप्ती-

कार्यात्मक दृष्टिकोनातून संशोधनाच्या व्याप्तीमध्ये रेशीम उत्पादनाची भांडवल उभारणी, रेशीम धाग्याची विक्री, रेशीम उद्योगांची उत्पन्न पातळी रेशीम उद्योग व शैक्षणिक पात्रता कोरडवाहू जमिनीतून येणारे उत्पन्न, रेशीम उद्योगातून निर्माण होणारा रोजगार, तसेच सरकारी पायाभूत सुविधा, सवलती, योजना अनुदाने सरकारी प्रशिक्षण आणि रेशीम उद्योगाच्या सर्वसाधारण समस्या व उपाययोजना यांचा समावेश करण्यात आला आहे.

3. कालावधी-

संशोधनाचा कालावधी पाच वर्षापर्यंत मर्यादित आहे म्हणजेच 2019-2020 ते 2023-2024.

<u>संशोधन पद्धती-</u>

1. नमुना आकार-

मराठवाड्याच्या आठ(08)जिल्ह्यातील रेशीम व्यवसायाची निवड करण्यात आलेली आहे.यामध्ये हिंगोली, परभणी ,जालना,, औरंगाबाद, लातूर,नांदेड, बीड व उस्मानाबाद इत्यादींचा समावेश आहे.

संशोधनासाठी निवडलेल्या जिल्हा निहाय उद्योगाची संख्या खालील प्रमाणे आहेत.

अ.क्र	**मराठवाड्यातील जिल्हे**	**उद्योगांच्या संख्या**
1.	**हिंगोली**	**50**
2.	**परभणी**	**50**
3.	**जालना**	**50**
4.	**औरंगाबाद**	**50**
5.	**लातूर**	**50**
6.	**नांदेड**	**50**
7.	**बीड**	**50**
8.	**उस्मानाबाद**	**50**
	एकूण जिल्हे (08)	**एकूण उद्योग 400**

2. सांख्यिकीय साधने-

साध्या सांख्यिकीय साधनाच्या मदतीने माहितीचे विश्लेषण केले जाईल. अंकगणित, सरासरी, मानक विचलन ,सहसंबंध विश्लेषण,टक्केवारी इत्यादी गृहीतके,X2 चाचणीच्य मदतीने तपासले जातात.तसेच T test, Z test, F test, Chi-Square test, Anova test इत्यादी चाचणी पद्धतीचा वापर केला जाईल.

3. माहितीचे सादरीकरण-

मूल्यमापन आणि अर्थ लावण्यासाठी सांख्यिकीय माहिती तक्ते, आलेख तक्ते आणि आकृत्यांच्या स्वरूपात दर्शविले जाईल.

संशोधनाच्या मर्यादा-

हे संशोधन अभ्यासात असताना पुढील मर्यादा निर्देशनास येतात.

1. सदर संशोधन हे केवळ मराठवाडा विभागापुरते मर्यादित आहे.
2. हे संशोधन उत्पादकांच्या आर्थिक घटका पुरते मर्यादित आहे.
3.संशोधनातून काढलेले निष्कर्ष इतर उत्पादकांना लागू होतातच असे नाही.
4. अभ्यासातून काढलेले सामानी करण हे 100%अचूक असू शकत नाही.
5. याच संशोधनात सर्व सकारात्मक बाजूंचा विचार केला आहे नकारात्मक बाबी विचारात घेतल्या गेल्या नाहीत.

साहित्याचे पुनरावलोकन-

1**. पी. सुरेश (डिसेंबर 2002)-**यांनी श्री वेंकटेश्वरा विद्यापीठ तिरुपती येथून वाणिज्य विषयात **Problems and prospect of sericulture a study of cuddapah district Andhra Pradesh** या विषयामध्ये पीएचडी केली असून त्यांच्या प्रबंधनांमध्ये त्यांनी असे निष्कर्ष मांडणी केली की रेशीम व्यवसाय करणारे शेतकरी अत्यंत कमी शेती असणारे आहेत यामध्ये शेतकऱ्यांनी तुती झाडावर येणारे रोग कीड तसेच रेशीम कोषाला मिळणाऱ्या किमतीतील चढ-उतार शीतगृह सुविधेचा अभाव या समस्यांची मांडणी केली व सरकारी कर्मचाऱ्यांना मार्गदर्शनाबाबत सकारात्मकता दर्शविली.

2. फुले संजय (2007) रेशीम उद्योगात स्त्रियांचा सहभाग यांनी या लेखात असे सांगितले की रेशीम उद्योगात स्त्रियांचा सहभाग पुरुषांच्या बरोबरीने असणे आवश्यक आहे स्त्रियांचे आर्थिक व सामाजिक स्थान उंचावण्यासाठी रेशीम उद्योग सुरू करणे गरजेचे आहे स्त्री हा रेशीम उद्योगांमध्ये लक्ष घालून कमी कष्टात जास्त पैसा कमवू शकते.

3. कटीले म. रवींद्र (नोव्हेंबर 2007) रेशीम उद्योग यांनी या प्रकाशात रेशीम उद्योगाबाबत परिपूर्ण अशी माहिती दिली रेशीम उत्पादनात तुतीच्या लागवडीपासून ते पैठणी साडी निर्मितीपर्यंत संपूर्ण माहिती दिली तसेच रेशीम उद्योगाबाबत शासनाच्या सवलती योजना इत्यादी बाबत माहिती मांडली.

4. **कलांत्र लक्ष्मीकांत जाधव ,अधिकराव धामणे,संजय(जानेवारी 2009)** आपल्या पुस्तकात सांगितले अर्ध्या ते एकरी जमिनीत रेशीम शेती करून लक्षातिश होण्याची संधी मिळते.तसेच एकदा तुतीची लागवड केली असता 15 वर्ष उत्पन्न मिळविता येते याबाबत मांडणी केली. रेशीम शेतीतून वेगवेगळे उत्पादन निर्मिती बाबत माहिती दिली.

5. **मुळीक बुधानी(2012)** रेशीम उद्योग काळाची गरज यांनी या लेखात सांगितलेले बऱ्याच शेतकऱ्यांना रेशीम उद्योगाबाबत माहिती नाही सध्या बेभरवशाच्या शेतीला अनियमित पडणाऱ्या पावसाला व शेतीमालाच्या अनिश्चित बाजारभावाला पर्याय पीक म्हणून रेशीम उत्पन्न बघता येईल.

6. **शिंदे ए. एच. (एप्रिल 2014)** यांनी पुणे विद्यापीठ पुणे येथून अर्थशास्त्र विषयात एप्रिल 2014 मध्ये रेशीम कोष उत्पादनाद्वारे रोजगार निर्मिती या विषयांमध्ये एप्रिल 2005 ते मार्च 2010 या कालावधीचा पुणे जिल्ह्यातील रेशीम कोष उत्पादकाकडून कुटुंबातील व्यक्ती बरोबरच इतर मजुरांनाही रोजगार प्राप्त होताना दिसतो.

7. **थोरात एस.एच.(मार्च 2015)** यांनी सावित्रीबाई फुले पुणे, विद्यापीठ पुणे येथून वाणिज्य विषयात मार्च 2015 मध्ये A critical study of state government role in promotion of sericulture centres in western Maharashtra या विषयामध्ये पी.एच.डी.केली असून त्यांनी आपल्या निष्कर्षणात रेशीम उद्योगासाठी सरकारी अनुदाने सरकारी प्रशिक्षण राज्य सरकारकडून अनुदान मिळण्यास उशीर झाल्याने रेशीम उद्योग करणाऱ्या शेतकऱ्यांच्या अडचणी याबाबत सकारात्मक व नकारात्मक बाजूंची माहिती मांडली.

प्रकरण मांडणी- एकूण 06
प्रकरण पहिले-प्रास्ताविक,संशोधन पद्धती
प्रकरण दुसरे -संशोधनाशी संबंधित साहित्याचा आढावा
प्रकरण तिसरे- रेशीम उद्योगाबाबत सरकारची धोरणे
प्रकरण चौथे-मराठवाड्यातील रेशीम उद्योग
प्रकरण पाचवे- माहिती संकलन आणि विश्लेषण
प्रकरण सहावे- निष्कर्ष समस्या,उपाययोजना व शिफारशी.

आ.क्र.	कामाचे नियोजन	तात्पुरता कालावधी
1.	विषयाची निवड, अभ्यासक्रमाचे कार्य सारांश तयारी	6 महिने
2.	संबंधित साहित्याचा आढावा घेणे आणि संशोधन विषयानुसार आवश्यक माहितीचे संकलन आणि अभ्यास करणे आणि प्रकरण योजनेनुसार विषय तयार करणे	6 महिने
3.	संबंधित साहित्य आणि महिला रेशीम उद्योगाच्या तपशीलवार अभ्यास संबंधित माहितीचे संकलन आणि प्रगती अहवाल सादर करणे	6 महिने
4.	विषयाशी संबंधित संशोधन लेखाचे प्रकाशन व प्रगती अहवाल सादर करणे	6 महिने
5.	प्राथमिक माहितीचे विश्लेषण आणि व्याख्या काम अंतिम करणे	6 महिने
6.	प्रबंध सादरीकरणासह प्रगती अहवाल सादर करणे Viva -Voice	6 महिने

मुद्दा क्रमांक 2-
संशोधन प्रक्रियेतील परिस्थितीनुसार सदर संशोधन कार्यात आणि संशोधन पद्धतीत योग्य ते बदल करण्यात येतील.

संदर्भ-

1. पी. सुरेश (डिसेंबर 2002) problems and prospects of sericulture a study of cuddapah district Andhra Pradesh.

2. फुले संजय(2007) रेशीम उद्योगात स्त्रियांचा सहभाग.

3. कटिंले म.रवींद्र (2007 नोव्हेंबर) "रेशीम उद्योग"

4. कलांत्री लक्ष्मीकांत जाधव, अधिकराव धामणे, संजय (जानेवारी 2009) किमया रेशीम शेतीतून लक्षाधीशहोण्याची.

5. घाटोळे रा.णा.(2009-10) समाजशास्त्रीय संशोधन तत्वे व पद्धती.

6. ढगे एस .के., हसे सी.पी. (16 सप्टेंबर 2011) "संशोधन पद्धती"

7. जाधव सुनील महादेवरा (5 सप्टेंबर2012)"सामाजिक संशोधन पद्धती"

8. मुळीक बुद्धाजी 2009 "रेशीम उद्योग काळाची गरज"

9.शिंदे ए.एच.(एप्रिल 2014) रेशीम कोष उत्पादनाद्वारे रोजगार निर्मिती.

10. थोरात एस. एस.(मार्च 2015) A critical study of state government role in promotion of sericulture centre in western Maharashtra.

11. बोधनकर सुधीर,अलोणी विवेक ,कुलकर्णी मृणाल (2018) सामाजिक संशोधन पद्धती.

12. Vikas pedia- https;// Mr. vikaspediain. Agriculture.

13. Rajendra Reddy (2008).

—